# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः16.02.2025** **वारःरविवार**

---

- कापड उद्योगातील सर्वात मोठा आणि व्यापक कार्यक्रम –भारत टेक्स 2025 चं भारत मंडपम इथे आयोजन
- लहान-मोठ्या पारंपरिक उपायांचं महत्त्व विसरू नका – राष्ट्रपतींचा तरुणांना सल्ला
- बर्लिन चित्रपट महोत्सवात जगभरातील आघाडीच्या चित्रपट निर्मात्यांशी भारतीय शिष्टमंडळाचा संवाद
- छत्तीसगडमध्ये स्थानिक संस्थांच्या निवडणुकीत, भारतीय जनता पक्षाला १७३ पैकी १२६ जागांवर विजय आणि
- नवी दिल्ली रेल्वे स्थानकावर झालेल्या चेंगराचेंगरीत किमान १५ जणांचा मृत्यू तर अनेक जण जखमी

**<u>पंतप्रधान-भारत टेक्स २०२५</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज नवी दिल्लीतील भारत मंडपम इथे भारत टेक्स २०२५ मध्ये सहभागी होणार आहेत. भारत टेक्स हे कापड उद्योगातील जागतिक पातळीवरील एक भव्य प्रदर्शन असून ते उद्यापर्यंत सुरू राहणार आहे. यामध्ये कच्च्या मालापासून ते तयार उत्पादनांपर्यंत कापड साखळीतील सर्व उत्पादनं मांडण्यात आली आहेत. प्रदर्शनाबरोबरच विविध चर्चासत्र आणि प्रशिक्षण कार्यक्रमही घेतले जात आहेत. विशेष नवोपक्रम आणि स्टार्ट अप दालन तसंच हॅकेथॉनवर आधारित स्टार्टअप पिच फेस्ट आणि निधी योजना असे कार्यक्रम, तसंच डिझाइन स्पर्धाही घेण्यात येत आहेत . ५००० हून अधिक प्रदर्शक, १२० हून अधिक देशांतील ६००० आंतरराष्ट्रीय खरेदीदार आणि इतर विविध अभ्यागत या प्रदर्शनात सहभागी होण्याची अपेक्षा आहे. ITMF म्हणजे आंतरराष्ट्रीय वस्त्रोद्योग उत्पादक महासंघ, ICAC म्हणजे आंतरराष्ट्रीय कापूस सल्लागार समिती - यासह - जगभरातील २५ हून अधिक आघाडीच्या जागतिक वस्त्रोद्योग संस्था आणि संघटना यामध्ये सहभागी झाल्या आहेत.

**<u>पंतप्रधान शिखर परिषद</u>**

भारत केवळ भविष्याबद्दलच्या जागतिक चर्चेच्या केंद्रस्थानी नसून या चर्चांचं नेतृत्वही करत आहे; असं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. नवी दिल्लीत एका शिखर परिषदेला संबोधित करताना " जागतिक स्तरावर भारताला पूर्वी कधीही मिळालं नव्हतं असं स्थान मिळालं आहे." असं मोदी यांनी

सांगितलं. प्रमुख राष्ट्र किंवा जागतिक व्यासपीठाचा भारतावरील विश्वास पूर्वीपेक्षा अधिक मजबूत झाला आहे. भारत पहिल्या तीन औद्योगिक क्रांती चुकला परंतु चौथ्या वर्षात जगासोबत पुढे जाण्याकरता भारत तयार आहे. येत्या काळात भारत जगातली तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनेल असा विश्वासही मोदी यांनी व्यक्त केला.

**राष्ट्रपती**

पारंपारिक समुदायांच्या ज्ञानाकडे दुर्लक्ष करू नका . लहान-मोठ्या पारंपारिक उपायांचं महत्त्व विसरू नका असा सल्ला राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी नवोन्मेषक आणि उद्योजकांना दिला आहे. रांची इथल्या एका समारंभात बोलताना - तरुणांचा उत्साह आणि वचनबद्धता 'विकसित भारत' उभारण्यात महत्त्वाची भूमिका बजावेल असं त्यांनी सांगितलं. केंद्र सरकार उच्च शिक्षणात यांत्रिक अभियांत्रिकीचा समावेश करण्यासाठी सक्रिय पावलं उचलत आहे. विज्ञान, अभियांत्रिकी, तंत्रज्ञान आणि गणित या विषयांमध्ये मुली मागे नाहीत असंही राष्ट्रपती म्हणाल्या .

**वैष्णव-पुल**

कमी आणि मध्यम उत्पन्न गटांवर लक्ष केंद्रित केल्यामुळे अर्थव्यवस्थेला जलद गतीने वाढण्याकरता मदत झाल्याचं रेल्वे आणि माहिती - प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी म्हटलं आहे. बेंगळुरूमध्ये पत्रकारांशी बोलतांना सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांना आणि शेतकऱ्यांना प्रोत्साहन देणे, तसंच कमी आणि मध्यम उत्पन्न गटांवर लक्ष केंद्रित करणे या सर्वांमुळे सर्व क्षेत्रांचा सर्वांगीण विकास होण्यास मदत झाली आहे. मोठ्या प्रमाणात कर कपातीमुळे मध्यमवर्गाला फायदा झाला आहे. यूपीएच्या काळात गुंतवणुकीची रक्कम फक्त अडीच लाख कोटी रुपये होती ती आता १५ लाख कोटी रुपयांपर्यंत वाढली आहे असं त्यांनी सांगितलं.

**नड्डा ऑन्कोलॉजी कॉन्क्लेव्ह**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या गतिमान नेतृत्वाखाली भारतीय आरोग्य सेवा व्यवस्थेत महत्त्वपूर्ण बदल होत आहेत, असं केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री जगत प्रकाश नड्डा यांनी म्हटलं आहे. हरियाणातील झज्जर इथे राष्ट्रीय कर्करोग संस्थेच्या अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्थेत दुसऱ्या ऑन्कोलॉजी कॉन्क्लेव्हच्या उद्घाटन समारंभाला काल संबोधित करताना ते बोलत होते. राष्ट्रीय कर्करोग संस्थेसारख्या संस्थांमध्ये अस्थिमज्जा प्रत्यारोपण शक्य आहे. आयुष्मान आरोग्य मंदिरांमध्ये २६ कोटींहून अधिक लोकांची तोंडाच्या कर्करोगासाठी, १४ कोटींहून अधिक लोकांची स्तनाच्या कर्करोगासाठी आणि ९ कोटींहून अधिक लोकांची गर्भाशयाच्या कर्करोगासाठी तपासणी करण्यात आली आहे असं नड्डा यांनी सांगितलं .

**इस्रायल**

गेल्या महिन्यात सुरू झालेल्या युद्धबंदी करारांतर्गत हमासने काल गाझा पट्टीतील तीन इस्रायली बंधकांना सोडलं . युद्धबंदी करारानंतर कैद्यांची ही सहावी अदलाबदल आहे. हमासच्या मते, त्या बदल्यात इस्रायलने ३६९ पॅलेस्टिनी कैद्यांना सोडलं आहे .

**<u>वेव्हज आउटरीच प्रोग्राम</u>**

बर्लिन चित्रपट महोत्सवात काल जागतिक ऑडिओव्हिज्युअल आणि मनोरंजन शिखर परिषद - वेव्हज २०२५ साठी एक आउटरीच कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. भारतीय शिष्टमंडळाने युरोपियन चित्रपट बाजारपेठेत सहभागी झालेल्या जगभरातील आघाडीच्या चित्रपट निर्मात्यांशी संवाद साधला. या सत्रात, भारताच्या प्राचीन वारशाचं आणि आधुनिक तंत्रज्ञानातील प्रगतीचं अनोखं मिश्रण - यावर चर्चा करण्यात आली. बर्लिन चित्रपट महोत्सवाने वेव्हज २०२५ शिखर परिषदेत सहभागी होण्यासाठी आघाडीच्या चित्रपट व्यक्तिरेखांना आमंत्रित केलं आहे. या प्रसंगी, प्रसिद्ध दिग्दर्शक आणि अभिनेते शेखर कपूर यांनी बर्लिनेलमध्ये भारतीय मनोरंजन उद्योगाच्या अफाट क्षमतेवर प्रेरणादायी भाषण दिलं . पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं ध्येय भारताच्या कानाकोपऱ्यातील निर्मात्यांना जागतिक व्यासपीठ उपलब्ध करून देऊन सक्षम करणे आहे. असं त्यांनी सांगितलं .
आंतरराष्ट्रीय उद्योगासाठी भारताच्या वेगाने वाढणाऱ्या ॲनिमेशन, व्हिज्युअल इफेक्ट्स, गेमिंग, कॉमिक्स आणि एक्सटेंडेड रिॲलिटी क्षेत्राशी सहकार्य करण्याची एक उत्तम संधी असल्याचं कपूर यांनी म्हटलं आहे .

**<u>छत्तीसगढ</u>**

छत्तीसगडमधील नागरी संस्थांच्या निवडणुकीत, भारतीय जनता पक्षाने १७३ नागरी संस्थांपैकी १२६ जागा जिंकल्या आहेत आणि काँग्रेसने ३९ जागा जिंकल्या आहेत. राज्यातील दहाही महानगरपालिकांमध्ये महापौरपदासाठी भारतीय जनता पक्षाचे उमेदवार निवडून आले आहेत. एकूण ४९ नगरपालिकांपैकी ३५ नगरपालिकांमध्ये भाजपचे उमेदवार अध्यक्षपदासाठी निवडून आले आहेत. काँग्रेसने आठ नगरपालिकांमध्ये, आम आदमी पक्षाने एका नगरपालिकेत आणि अपक्ष उमेदवारांनी पाच नगरपालिकांमध्ये विजय मिळवला आहे. ११४ नगरपंचायतींपैकी भाजपने ८१ तर काँग्रेसने २२ नगरपंचायती जिंकल्या आहेत. याशिवाय एका नगरपंचायतीत बहुजन समाज पक्षाचे उमेदवार तर १० नगरपंचायतीत अपक्ष उमेदवार निवडून आले आहेत .

**<u>दिल्ली अपघात</u>**

काल संध्याकाळी नवी दिल्ली रेल्वे स्थानकावर झालेल्या चेंगराचेंगरीत किमान १५ जणांचा मृत्यू झाला आणि अनेक जण जखमी झाले. प्रयागराजला जाणाऱ्या रेल्वेगाड्यांमध्ये चढण्यासाठी प्रवाशांची गर्दी वाढल्यामुळे ही चेंगराचेंगरी झाल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या घटनेवर दुःख व्यक्त केलं आहे.

केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी परिस्थिती आता नियंत्रणात असल्याची माहिती समाज माध्यमावरून दिली आहे . गर्दी कमी करण्यासाठी प्रयागराजमधील महाकुंभासाठी तात्काळ चार विशेष रेल्वे गाड्या पाठवण्यात आल्या आहेत. आपली संपूर्ण टीम या घटनेत बाधित झालेल्यांना मदत करण्यासाठी काम करत आहे असं ते म्हणाले .
सर्वांना शक्य ती सर्व मदत करण्याचे निर्देश केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी दिले आहेत

**<u>संगमम</u>**

केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान, उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ आणि केंद्रीय माहिती आणि प्रसारण राज्यमंत्री एल. मुरुगन यांनी काल वाराणसीमध्ये तिसऱ्या काशी तमिळ संगमचे उद्घाटन केलं . काशी तमिळ संगम - विविधतेत एकता दाखवत आहे. यामुळे 'एक भारत, श्रेष्ठ भारत'ची भावना बळकट होत आहे असं प्रधान म्हणाले. यंदा पहिल्यांदाच सहभागींना प्रयागराज महाकुंभ पाहण्याची आणि अयोध्येतील नव्याने बांधलेल्या राम मंदिराला भेट देण्याची संधी मिळेल. काशी तमिळ संगमम हे कला आणि संस्कृती जाणून घेण्यासाठी एक उत्कृष्ट व्यासपीठ आहे. काशी तमिळ संगमम हा - एक भारत श्रेष्ठ भारत - या संकल्पनेला चालना देण्याचा प्रयत्न आहे असं मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी सांगितलं .

**<u>दिल्ली</u>**

काल हरियाणातील फरीदाबाद इथे आयोजित ३८ व्या सूरजकुंड आंतरराष्ट्रीय हस्तकला मेळाव्यात देशभरातून मोठ्या संख्येने लोक सहभागी झाले होते. यंदा मध्य प्रदेश आणि ओडिशा राज्यांनी हा मेळावा आयोजित केला आहे. यामध्ये इजिप्त, इथिओपिया, सीरिया, अफगाणिस्तान, बेलारूससह ४२ देशांतील सहाशे प्रदर्शक सहभागी होत आहेत. याशिवाय, बांगलादेश, भूतान, म्यानमार, नेपाळ, श्रीलंका आणि थायलंड या बिमस्टेक राष्ट्रांसह अनेक देश देखील या मेळाव्यात सहभागी होत आहेत. या मेळ्याचा उद्देश हस्तकला उत्पादने आणि हातमाग यांना प्रोत्साहन देणे आहे.

**<u>क्रिकेट - चॅम्पियन्स ट्रॉफी</u>**

रोहित शर्माच्या नेतृत्वाखालील भारतीय क्रिकेट संघ आगामी आयसीसी चॅम्पियन्स करंडक स्पर्धेसाठी काल मुंबईहून दुबईला रवाना झाला. भारत २० फेब्रुवारी रोजी बांगलादेशविरुद्ध पहिला सामना खेळेल, त्यानंतर २३ फेब्रुवारी रोजी पाकिस्तानविरुद्ध आणि २ मार्च रोजी न्यूझीलंडविरुद्ध सामने होतील. दुखापतीमुळे जसप्रीत बुमराह बाहेर असल्याने, तरुण वेगवान गोलंदाज अर्शदीप सिंग आणि हर्षित राणा यांना चमक दाखवण्याची संधी आहे, तर फिरकी गोलंदाज वरुण चक्रवर्ती त्याचा प्रभाव पाडण्याची आशा आहे.

**याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.**